# केस स्टडी- पिठाची चक्की (घरगुती उद्योग )




अभ्यासक

ज्ञानेश्वर भुईंगल

रितिका बंदरकर

मार्गदर्शक

डॉ.मिलिंद  सोहोनी सर

श्री.राजाराम देसाई सर

**आभार :**

आम्ही **डॉ.मिलिंद सोहोनी सर** आणि **श्री.राजाराम देसाई** सर ह्यांचे ही केस स्टडी तयार करण्यासाठी मार्गदर्शन केल्याबद्दल तसेच चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्याचे आंम्ही मनपूर्वक आभार मानत आहोत. तसेच आम्ही **श्री. दुर्गा प्रसाद** ह्या चक्की चालकाचे हि विशेष आभार मानू इच्छितो. कारण त्यांनी पूरवलेल्या माहितीच्या आधारे आम्ही चक्की व्यवसायाबाबत तपशीलवार माहिती व त्यात येणाऱ्या अडचणी जाणून घेऊ शकलो.

**घोषणा :**

आम्ही घोषित करतो की हे लिखित दस्तावेज आमच्या स्वतःच्या शब्दात आमच्या कल्पनांचे प्रतिनिधित्व करतो. आम्ही मूळ स्त्रोतांचा संदर्भ दिला आहे. आम्ही शैक्षणिक तत्त्वांचे प्रामाणिकपणे आणि सचोटीने पालन केले आहे आणि चुकीचे वर्णन केले नाही.आम्हाला माहित आहे कि आमच्या दस्तावेजमधील कोणत्याही कल्पना, डेटा, तथ्ये किंवा स्त्रोत बनावट किंवा खोटे असेल तर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संस्थेद्वारे आमच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल आणि स्त्रोतांकडून दंडात्मक कारवाई केली जाईल.

**गोषवारा :**

भारतासाठी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे रोजगार. भारतातील शाळा-महाविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या कोट्यवधी तरुणांना अर्थपूर्ण नोकऱ्या कुठे मिळणार आहेत. या संदर्भात, उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये खालील गोष्टींबद्दल समज विकसित केली पाहिजे. भारत हा खेड्यांचा देश आहे जिथे प्राचीन काळापासून शेती आणि त्याच्याशी संबंधित कामे हे उपजीविकेचे प्राथमिक स्त्रोत आहेत. आजच्या युगात, उपलब्ध साधनांच्या आधारे ग्रामीण भागात स्वयंरोजगाराची उच्च क्षमता आहे. लघु उद्योगांच्या वाढीसह ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध करणे हा अभ्यास आणि संशोधनासाठी महत्त्वाचा विषय आहे. व्यवसाय क्षमता, संसाधनांची उपलब्धता, बाजारातील संधी, समस्या आणि आव्हाने इत्यादी प्रमुख मुद्द्यांसह अशा मार्गांचा शोध घेणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

**अनुक्रमणिका :**


१. **परिचय**

१. १ आपल्या परिसरातील पिठाच्या गिरणींची परिस्तिथी

१.२ केस स्टडीचे उद्दिष्ट

१.३ पिठाची चक्की निवडण्यामागचे कारण

२. **चक्की व्यवस्थापन तक्ता**

२.१ संसाधने आणि यंत्रसामग्री

२.२ कार्यरत/उपलब्ध आहे का

२.३ किती वेळ वापर होतो

३. **क्षेत्र भेट आणि माहिती संकलन**

३.१ पूर्व तयारी

३.२ पिठाची चक्की - "राजा फ्लोर मिल"

३.३ चक्कीच्या तांत्रिक व आर्थिक बाबी,वार्षिक आढावा

३.४ चक्कीची प्रक्रिया

३.५ चक्कीतील दैनंदिन कार्य

४. **कोविड -१९ लॉकडाऊन परिणाम**

५. **चक्की व्यवसाय सुरु करण्यास सध्याच्या बाजारमूल्यानुसार लागणारे भांडवल**

५.१ दुकानाचे भाडे

५.२ परवाना खर्च

५.३ यंत्रसामग्री खर्च

५.४ इंस्टॉलेशन खर्च

५.५ विद्युत बिल

५.६ कामगार पगार

५.७ किरकोळ खर्च

६. **चक्की व्यवसायातील अडचणी**

६.१ जागेचा अभाव

६.२ अंगमेहनत

६.३ श्वसनविकार

६.४ बाजारातील स्पर्धा

७. **सारांश**

## १. परिचय

### १. १ आपल्या परिसरातील पिठाच्या गिरणींची परिस्तिथी

आपण आपल्या आजूबाजूच्या परिसरात अनेक पिठाच्या चक्क्या पाहतो,आपण विचार करतो कि खरच इतक्या चक्कीची गरज आहे का ?ह्याचे उत्तर आहे "हो" कारण परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पिठाचीही मागणी वाढत आहे.

### १.२ केस स्टडीचे उद्दिष्ट

शालेय आणि महाविद्यालयीन अभ्रासक्रमात विध्यार्थ्यांना नेहमीचे विषय शिकवले जातात पण व्यावहारिक ज्ञान दिले जात नाही त्यामुळे मुलांना उद्योगधंद्याबाबत रुची निर्माण होत नाही. त्यांना कधी प्रश्न पडत नाही कि एखादा व्यवसाय कसा उभा राहतो,कसा चालतो,यातील नफा तोटा कसा असतो,यात अडचणी काय येतात. हेच व्यावहारिक ज्ञान विध्यार्थ्यांना तेव्हाच मिळेल जेव्हा ते एखाद्या लघु उद्योगाला भेट देऊन तेथील कार्यप्रणाली बघतील,त्याचा अभ्यास करतील.ह्या केस स्टडीचा उद्देश हाच आहे कि विध्यार्थ्यांना व्यवहारज्ञान आत्मसात करण्याची सवय लागावी. ह्यामुळे फायदा असा होईल कि उद्योगक्षेत्रात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लागेल.प्रत्येक विषयांवर अशा प्रकारच्या केस स्टडी बनवणे हि काळाची गरज आहे,सर्व शिक्षकांनी,प्राध्यापकांनी पुढाकार घेऊन विध्यार्थ्यांच्या मनावर हि गोष्ट बिंबवली पाहिजे. त्यांना केस स्टडी बनवण्याबाबत उद्युक्त केले पाहिजे.भविष्यात याचा उपयोग त्यांना तर होईलच त्याचबरोबर समाजाला,राष्ट्राला देखील होईल.

### १.३ पिठाची चक्की निवडण्यामागचे कारण

पिठाची चक्की निवडण्यामागचे कारण कि हा व्यवसाय करणे फार किचकट नाही तसेच यात जास्त यंत्रांची आवश्यकता नसते,जास्त मनुष्यबळाची गरज नसते.

हा व्यवसाय समजण्यास फारच सोपा आहे. ह्या व्यवसायाशी आपला दररोज निकटचा संबंध येतो म्हणून आम्ही ह्या व्यवसायाची निवड केलेली आहे.

## २. <u>चक्की व्यवस्थापन तक्ता</u>


| **संसाधने आणि यंत्रसामग्री** | **कार्यरत/उपलब्ध आहे का** | **दिवसभरात किती वेळ वापर होतो** |
|---|---|---|
| जागा/दुकान | आहे | ७ ते ८ तास |
| चक्की मशीन | आहे | ७ ते ८ तास |
| मोटर | आहे | ७ ते ८ तास |
| बेल्ट | आहे | ७ ते ८ तास |
| ग्राइंडिंग व्हिल | आहे | ७ ते ८ तास |
| औद्योगिक वीज जोडणी | आहे | ७ ते ८ तास |
| पंखा | आहे | १ तास |
| रॅक | आहे | ७ ते ८ तास |
| सरकारी परवाना<br>१)गुमास्ता लायसन्स<br>२)उद्योग आधार रजिस्ट्रेशन<br>३)जी.एस.टी रजिस्ट्रेशन | <br>आहे<br>आहे<br>आहे | |
| मनुष्यबळ | आहे | ७ ते ८ तास |

## ३. <u>क्षेत्र भेट आणि माहिती संकलन</u>

<u>३.१ पूर्व तयारी</u>

या केस स्टडीसाठी आम्ही भांडुप वेस्ट हनुमान नगर या भागातील लघु उदयोजक **श्री. दुर्गा प्रसाद** यांच्या पिठाच्या गिरणीची **राजा फ्लोअर मिल** ( चक्कीची ) निवड केली आहे. चक्कीला प्रत्येक्ष भेट देऊन जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा प्रयास आम्ही करणार आहोत. १ आठवड्यापूर्वी आम्ही दुर्गा प्रसाद ह्यांना या सर्व केस स्टडीची व केस स्टडीच्या हेतूंबद्दल माहिती दिली होती. त्यांनी आम्हाला माहिती विचारण्याची परवानगी दिली आहे. केस स्टडी दरम्यान आम्ही तयार केलेल्या प्रश्नावली संबंधित चर्चा, फोटोग्राफ्स च्या माध्यमातून PPT तयार करणे,

विडिओ द्वारे सोशल मीडिया माध्यमातून यूट्यूब वर प्रसारन करणे या गोष्टी आम्ही करणार आहोत. नकाशा स्थान क्र. १ आपल्याला राजा फ्लोअर मिल यांचे स्थान दर्शवत आहे.




नकाशा स्थान क्र. १

## <u>३.२ पिठाची चक्की - "राजा फ्लोर मिल"</u>

"राजा फ्लोर मिल" ह्या पिठाच्या चक्कीची सुरुवात सन १९७८ सालापासून भांडुप (प.) मधील जगन्नाथ यादव चाळ, हनुमान नगर परिसरात झालेली आहे, हि चक्की सुरुवातीपासून भाडेतत्वावर चालवली जात आहे. चक्कीच्या मालकाचे नाव विजय प्रकाश शेठ आहे. श्री. दुर्गाप्रसाद रामबचन प्रजापती सध्या हि चक्की चालवत आहेत.त्यांच्या वडिलांनी १९७८ पासून हि चक्की चालविण्यास सुरुवात केली. सन २०१४ पासून चक्कीचा कारभार दुर्गाप्रसाद ह्यांच्याकडे आला. श्री दुर्गाप्रसाद ह्यांचा जन्म भांडुप (मुंबई ) येथे झाला असून त्यांचे शिक्षण इयत्ता १० पर्यंत झालेले आहे, त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी, दोन मुले आणि त्यांची आई आहे. ह्या सर्वांचा उदरनिर्वाह चक्कीच्या उत्पन्नावरच चालतो.



चित्र क्र. २ (चक्कीचे दुकान)

**३.३ चक्कीच्या तांत्रिक व आर्थिक बाबी,वार्षिक आढावा**

श्री.दुर्गा प्रसाद ह्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार चक्कीची किंमत ७०,००० रुपये असून तिची खरेदी मंगतराम या भागातून केली आहे. चक्कीच्या मशीन ची लाईफ १० वर्ष आहे. चक्कीला १,००,००० रुपयांची १० एच. पी ची १ मोटर बसवलेली आहे. १० एच. पी च्या मोटर ची हमी १ वर्ष आहे. चक्की नीट चालत असेल तर छोटा देखभालीचा खर्च १,००० ते १,५०० पर्यंत येतो तसेच चक्की नीट चालत नसेल तर मोठ्या देखभालीचा खर्च ५,००० पर्यंत येतो. परंतु हा खर्च चक्की वर अवलंबून असतो. ग्रीसिंग, तेलपाणी, नट बोल्ट फिटींग चा खर्च महिन्याला १,००० ते १,५०० रुपये येतो, हा खर्च दुर्गा प्रसाद स्वतः करतात. श्री.दुर्गा प्रसाद चक्की साप्ताहिक पद्धतीने भाडेतत्वावर चालवतात म्हणजे दर आठवड्याला त्यांना मूळ मालकांना त्यांचा हिस्सा द्यावा लागतो. दर आठवड्याला मालकाला ४००० रुपये द्यावे लागतात आणि स्वतःला ते ३००० ते ३५०० रुपये ठेवतात. सरासरी महिन्याला चक्कीतून ३२००० ते ३५००० रुपयांचे उत्पन्न मिळते त्यातून निम्मे पैसे मूळ मालक घेतात व बाकीचे दुर्गा प्रसाद स्वतःसाठी ठेवतात. विजेचे बिल दर महिन्याला ४००० ते ४५०० रुपये येते ते मालक भरतात. प्रत्येक महिन्यात ५०० ते ५५० विद्युत युनिट वापरले जातात. मशीन मध्ये मोठा बिघाड झाला असेल तर ५००० ते ६००० रुपये खर्च येतो, हा खर्च मालक देतात.

**वार्षिक आढावा**

| अ.क्र | वार्षिक आढावा | रुपये |
|---|---|---|
| **१** | **चक्कीची वार्षिक कमाई** | **₹४,२०,०००** |
| i | चक्की मालक हिस्सा<br>(-) वीज बिल<br>(-) मोठा बिघाड खर्च<br><br>**मालकाची मिळकत** | ₹२,१०,०००<br>₹४८,०००<br>₹६,०००<br><br>**₹१,५६,०००** |
| ii | दुर्गा प्रसाद हिस्सा<br>(-) देखभाल खर्च<br><br>**दुर्गा प्रसाद मिळकत** | ₹२,१०,०००<br>₹६,०००<br><br>**₹२,०४,०००** |

## ३.४ चक्कीची प्रक्रिया

- चक्कीचा वरचा भाग चौकोनी निमुळत्या आकाराचा आहे  व त्याखालील भाग वर्तुळाकार आहे, ह्या वर्तुळाकार भागामध्ये दोन ग्राइंडर व्हील लंबरेषेत बसवलेले आहेत.
- गोलाकार भागावर समोरच्या बाजूला पीठ बाहेर येण्यासाठी एक निमुळता भाग आहे. चित्र क्रमांक. ५ मध्ये दर्शविल्या नुसार  ह्या निमुळत्या भागावर पीठ बाहेत उडू नये म्हणून एक कापडाची झडप लावलेली आहे.
- दुसऱ्या बाजूला १० एच. पी ची मोटर बसवलेली आहे. चक्की आणि मोटर यांना जोडण्यासाठी एक वर्तुळाकार पट्टा लावलेला आहे. चक्कीला आणि मोटरला विजेची जोडणी आहे.
- हि विद्युतजोडणी औद्योगिक स्वरूपाची आहे. विजेचा स्वीच चालू केल्यावर मोटर चालू होते त्यामुळे लावलेला पट्टा गोलाकार फिरतो व हा पट्टा चक्कीशी जोडलेला असल्याने चक्कीतील दोन्ही ग्राइंडर व्हील घर्षण करत वर्तुळाकार फिरतात.
- चौकोनी पात्रात धान्य टाकल्यानंतर हे धान्य दोन्ही ग्राइंडर व्हील च्या मध्ये येते व त्यांचे घर्षण होऊन त्याचे रूपांतर पिठात होते त्यानंतर पीठ निमुळत्या भागातून खाली येते व खाली ठेवलेल्या पात्रात (डब्बा, पिशवी) जमा होते.
- चक्की मशीन च्या आसपास धान्याचे डब्बे, पिशवी ठेवण्यासाठी लाकडी रॅक बनवलेले आहे. दळलेले धान्य आणि न दळलेले धान्य वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले जाते.
- चक्की चालवणाऱ्याला बसण्यासाठी एक लाकडी स्टूल आहे तसेच ग्राहकांना बसण्यासाठी लाकडी बाकडा ठेवलेला आहे.
- धान्य मोजण्यासाठी दुकानात तराजू काटा व मापे ठेवलेली आहेत.
- चक्कीचे चित्र खाली पहा




## ३.५ चक्कीतील दैनंदिन कार्य

- श्री दुर्गाप्रसाद दररोज सायंकाळी ५ वाजता चक्की चालू करतात आणि रात्री १० वाजता बंद करतात. ह्या कामात त्यांची पत्नी त्यांना मदत करते.दुसरा कोणताही कामगार त्यांनी कामास ठेवलेला नाही.
- सरासरी १०० किलो धान्य रोज दळले जाते. प्रति किलोमागे ५० ते १०० ग्राम पीठ वाया जाते.धान्यामध्ये गहू, ज्वारी, बाजरी,नाचणी, तांदूळ, मेथी, हरभरा यांचा मुखत्वे समावेश असतो. प्रत्येक धान्याचा दळायचा प्रति किलो दर वेगवेगळा आहे.
- रोजच्या दळनामध्ये सर्व धान्यामध्ये गव्हाचा वाटा मोठा असतो. म्हणजे गहू हे धान्य सर्वात अधिक दळले जाते. पीठ हे जाडे किंवा बारीक दळले जाते हे ग्राहकाच्या मागणीवर अवलंबून असते.
- ग्राहकांकडून धान्य हे जास्तकरून कापडी पिशवी अथवा गोणीतुन आणले जाते. धातूच्या डब्यातून धान्य आणण्याचे प्रमाण खूप कमी आहे कारण दळलेले पीठ गरम असते त्यामुळे डब्बाही गरम होतो व हातांना त्याचे चटके बसतात.
- कधी कधी धान्य व्यवस्थित न दळल्यामुळे ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागते व ग्राहकाला आपले पीठ द्यावे लागते. परंतु अशी परिस्थिती क्वचितच येते.
- काही ग्राहक दुर्गा प्रसाद ह्यांच्याकडून रेडिमेड पिठ हि नेतात त्याचे प्रतिकिलो दर वेगवेगळे आहेत.खालील तक्ता मध्ये दर दर्शवले आहेत.

| अ.क्र | धान्याचे नाव | किलो | रुपया |
|---|---|---|---|
| १ | गहू | प्रति किलो | ८.०० रुपये |
| २ | बाजरी | प्रति किलो | ८.०० रुपये |
| ३ | ज्वारी | प्रति किलो | ८.०० रुपये |
| ४ | चना डाळ | प्रति किलो | १०.०० रुपये |
| ५ | तांदूळ | प्रति किलो | १०.०० रुपये |
| ६ | ढोकळा | प्रति किलो | ८.०० रुपये |
| ७ | रवा | प्रति किलो | ८.०० रुपये |
| ८ | भांजणी | प्रति किलो | १०.०० रुपये |
| ९ | मका ( सिंगल ) | प्रति किलो | २०.०० रुपये |
| १० | मेथी | प्रति किलो | २०.०० रुपये |



**रॅकवर दळून ठेवलेले वेगवेगळ्या धान्याचे पीठ**

४. <u>कोविड -१९ लॉकडाऊन परिणाम</u>

कोविड काळात लॉकडाऊनचा फारसा परिणाम चक्की उद्योगावर झाला नाही.लॉकडाऊनच्या सुरवातीच्या काळात काही दिवस चक्की पूर्णपणे बंद होती. त्यानंतर शटर बंद ठेऊन ग्राहकांचे दळन दळून दिले जात. धान्य,पीठ ह्या जीवनावश्यक गरजा असल्यामुळे शासनाने काही नियम पळून चक्की चालू ठेवण्यास परवानगी दिले. लॉकडाऊनचे ज्याप्रमाणे दुसऱ्या उद्योगांवर गंभीर परिणाम झाले तसे चक्की उद्योगाबाबत नाही झाले.

५. <u>चक्की व्यवसाय सुरु करण्यास सध्याच्या बाजारमूल्यानुसार लागणारे भांडवल</u>

**टीप:- वरील नमूद केलेला चक्की व्यवसाय सन १९७८ साली सुरु केलेला आहे. साधारणतः ह्या व्यवसायाला ४२ वर्ष झालेली आहे त्यामुळे तेव्हाच्या व्यवसाय उभारणीच्या खर्चाची आकडेवारी उपलब्ध नाही आहे. आताच्या काळात हा व्यवसाय सुरु करायचा असेल तर खालील दिलेल्या आकडेवारीचा उपयोग करू शकता.**

| **वस्तू** | **रुपये** |
|---|---|
| **(अ) यंत्रसामग्री आणि जागा:-** | |
| जागेचे डिपॉजीट किंवा आगाऊ ठेव | ₹ २५००० |
| चक्की उपकरणासहित | ₹ १६६०० |
| रोस्टर | ₹ २०५०० |
| चक्की डबल स्टेज | ₹ १७८०० |
| गॅस कनेक्शन | ₹ १०००० |
| वजन काटा | ₹ ८००० |
| सिलिंग मशीन | ₹ ३००० |
| वेसल्स | ₹ ६००० |
| **एकुण** | **₹ १५००००** |
| | |
| **(ब)खेळते भांडवल:-** | |
| कच्चा माल | ₹ ५०००० |
| पगार | ₹ ३९००० |
| वीज बिल | ₹ ९००० |
| गॅस | ₹ २००० |
| **एकुण** | **₹ १०००००** |
| | |
| **चक्की प्रोजेक्ट कॉस्ट** | |
| (अ) यंत्रसामग्री आणि जागा | ₹ १५०००० |
| (ब)खेळते भांडवल | ₹ १००००० |

| | |
|---|---|
| **एकुण** | **₹२५००००** |
| | |
| **वित्त साधन:-** | |
| मालक गुंतवणूक | ₹१२५००० |
| बँक कर्ज | ₹१२५००० |
| **एकुण** | **₹२५००००** |
| | |
| **विक्री उलाढाल आणि मासिक खर्च** | |
| खेळते भांडवल | ₹१००००० |
| कर्ज हफ्ता | ₹५००० |
| जागेचे भाडे | ₹८००० |
| खेळत्या भांडवलवरील व्याज | ₹३००० |
| मजुरी | ₹१२,००० |
| देखभाल खर्च | ₹१५०० |
| इतर खर्च | ₹५०० |
| **एकुण** | **₹१,३०,०००** |
| | |
| **चक्कीतील नफा** | |
| विक्री (एका महिन्यात ३५०० किलोग्रॅम पीठ प्रतिकिलो ₹४०/- च्या दराने विकले जाते.) | ₹१,४०,००० |
| खर्च | ₹१,३०,००० |
| **नफा** | **₹१०,०००** |

## ६. चक्की व्यवसायातील अडचणी

### ६.१ : जागेचा अभाव

आताचे सुरु असलेले चक्की व्यवसाय खूप कमी जागेत चालू आहेत, साधारणत २५० ते ३०० चौ.फी जागेत हे व्यवसाय चालू आहेत. चक्की व्यवसायाचा व्याप बघता ह्यासाठी मोठी जागा पाहिजे. चक्की चालू असताना आवाजाचे प्रदूषण खूप होते त्यामुळे रहिवाशी विभागात लवकर चांगली जागा भेटत नाही आणि भेटली तर खूपच लहान असते. औद्योगिक भागात जागा घेऊ शकत नाही कारण जागेचे भाडे जास्त असते.शहरी भागा मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी जागेच्या भाड्याचा दर त्या वस्तीनुसार वेळोवेळी बदलत जातो. रहिवाशी भागामध्ये सरासरी ₹६००० ते ₹८००० पर्यंत भाडे आकारले जाते तेच भाडे औद्योगिक भागामध्ये ₹१५००० ते ₹२०००० पर्यंत भाडे असते. प्रत्येक वर्षी भाड्याचे दर बदलत असतात म्हणजे वाढत असतात.तसेच औद्योगिक परिसर लांब असल्यामुळे ग्राहक येण्यास नापसंती दर्शवतात कारण ह्या व्यवसायाचा ग्राहकवर्ग मुख्यतः मध्यमवर्गीय,नोकरदार,कष्टकरी,रोझनदारीवर काम करणारे लोक असतात त्यामुळे पैसे खर्चून लांब दळायला जाण्यास तय्यार नसतात.

### ६.२ : अंगमेहनत

सध्याच्या काळात चक्की उद्योगात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. श्रमविरहित चक्कीचे विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. ह्यामुळे अंगमेहनतीतचे काम कमी करावे लागते. पारंपारिक प्रकारच्या चक्कीत अंगमेहनत खूप करावी लागते,रोजच्या रोज चक्कीला ग्रीसिंग,तेलपाणी करावे लागते तसेच सर्वात जास्त मेहनत ग्राइंडर व्हीलला टाके मारण्यास लागते, साधारण रोज ४ ते ५ तास ह्या कामात जातात.

### ६.३ : श्वसनविकार

पिठाच्या चक्कीत काम करताना आरोग्यविषयक गंभीर समस्या उद्भवतात. धान्य दळताना चक्कीतून पीठ उडते ते नाका - तोंडातून शरीरात जाते. पीठ हा पदार्थ चिकट असल्याने श्वसनमार्गात आणि फुफुसात चिटकून बसतो हे मानव शरीरास अत्यंत हानिकारक आहे, भविष्यात ह्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

६.४ : **बाजारातील स्पर्धा**

ह्या व्यवसायात आता मोठे उद्योगसमूह नवीन तंत्रज्ञानासह उतरत आहे. ग्राहकांना बाजारात,मॉलमध्ये,ऑनलाईन वर सहज रेडिमेड पीठ उपलब्ध होत आहे. त्यामुळे ह्या व्यवसायाचे ग्राहक हळूहळू कमी होत आहे.

७. **सारांश**

- फ्लोअर मिल हा फायदेशीर व्यवसाय आहे.वरील सुचवलेल्या आकडेवारीनुसार ₹ २,५०,०००/- च्या गुंतवणुकीवर तुम्हाला १०,००० नफा मिळतो तसेच कालांतराने कर्ज समाप्त झाल्यावर त्याच्या हफ्त्याचे जाणारे पैसेही आपल्याकडे नफा म्हणून राहतात.
- पीठ हे सर्वांसाठी मुख्य आणि मूलभूत अन्नपदार्थांपैकी एक आहे. गिरणीतील गहू, बाजरी, मक्का, तांदूळ, बाजरी, मेथी अशा विविध प्रकारच्या धान्याच्या पिठांना चिरंतन मागणी आहे. त्यामुळे पिठासाठी गिरणी आवश्यक आहे.
- पारंपारिक चक्कीत शारीरिक कष्ट तुलनेने जास्त आहेत.
- आजूबाजूला नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले जात असल्याने पारंपरिक चक्कीतून उत्पन्न वाढीच्या संधी नाहीत.
- नवीन पिढीला या व्यवसायात उतरण्यासाठी पर्यायी कमी कष्टदायक, सुरक्षित व किफायतशीर तंत्रज्ञानाची माहिती करून घेणे आवश्यक आहे.
- पारंपरिक पिठाची चक्की फक्त दिवसा आणि सायंकाळी चालू असते. मध्यरात्रीनंतर आपण विजेचा वापर केला तर महावितरण आपल्याला वीज युनिटमध्ये सूट देते त्याचा परिणाम आपल्याला विजेचे बिल कमी येते. जर चक्की मध्यरात्रीनंतर चालवल्या गेली तर नक्कीच वीज बिलात त्याचा फायदा होईल. परंतु चक्की रहिवाशी भागात असल्यामुले ते रात्री चक्की चालू ठेवू शकत नाहीत कारण चक्कीच्या आवाजाने आजूबाजूच्या लोकांना त्रास होऊ शकतो. आताच्या काळात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे,चक्की उदयोगातही नवीन तंत्रज्ञान आलेले आहे ध्वनीविरहित चक्की मशीन बाजारात उपलब्ध आहे तसेच यात अंगमेहनतही खूप कमी आहे. नवीन तंत्रज्ञानावर आधारित चक्कीचा अवलंब केल्यास नक्कीच आपण मध्यरात्रीनंतर चक्की चालवू शकतो आणि त्याचा फायदा वीज बिलात घेऊ शकतो.